जा.क्र. आस्थापना/ 4752
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. 5 DEC 2019

## कार्यालयीन आदेश :

परीसर सुरक्षा समितीच्या दि. २७ ऑगस्ट २०१९ च्या बैठकीतील ठरावांनुसार खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधीत विभागांनी विद्यापीठ परीसर सुरक्षेच्या दृष्टीने आपल्यास्तरावर अनुषंगीक उचित कार्यवाही करावी.

| अ. क्र. | बैठकीतील विषय क्र. व विषय | ठराव | ठरावानुसार खालील विभागाने कार्यवाही करावयावची आहे. |
|---|---|---|---|
| १ | विषय क्र. ४ - सुरक्षा पोस्टवर चौकीदारांच्या सोईकरिता शौचालय पुरविण्याबाबत. | १. बायो टॉयलेट व कायम स्वरुपी स्वच्छतागृह ज्या ठिकाणी आवश्यक असतील त्याचा तपशील अभियांत्रिकी विभागास पुरवावा. | सुरक्षा विभाग |
| | | २. अभियांत्रिकी विभागामार्फत प्रवेश व्दार १, २ , ६, ८ व शिंदे विहीर क्र. २ व ३ या ठिकाणी कायम स्वरुपी सुरक्षा केबिनचे बांधकाम करावे (केबिनचे आकार व स्वरुप तंत्रज्ञान गेट केबिन प्रमाणे असावे.) | अभियांत्रिकी विभाग |
| २ | विषय क्र. ५ - परिसरातील चंदनाच्या वृक्षांच्या सुरक्षेबाबत | १. सुरक्षा गस्त व दक्षता वाढविणे | सुरक्षा विभाग |
| | | २. ज्या विभाग/अधिविभागाची मालमत्ता चोरीस गेली असेल त्या विभाग/आधिविभागामार्फत, कार्यालयीन कार्यवाहीनंतर, स्थानिक पोलीस कार्यालयास कायदेशीर तक्रार (एफ.आय.आर.नोंदविणे.) | संबधित सर्व प्रशासकीय विभाग व सर्व अधिविभाग |
| | | ३. विद्यापीठाच्या संपूर्ण परिसराभोवती टप्या-टप्याने भिंत (कंपाऊंड वॉल) बांधून घ्यावी. | अभियांत्रिकी विभाग |
| | | ४. चंदन व इतर मौल्यवान वृक्षांचे अवशेष हे उद्यान विभागामार्फत जतन करावे व त्याकरिता स्वतंत्र सुविधेची ऊ. गोडाउन, शेड इ. अभियांत्रिकी विभागामार्फत उभे करण्यात यावे. | उद्यान व अभियांत्रिकी विभाग |
| ३ | विषय क्र. ६ - परिसरात वारंवार लागणाऱ्या आगीबाबत. | १. सुरक्षा विभागाच्या सूचना, मास्टर प्लॅन मध्ये समाविष्ट कराव्यात.<br>२. विद्यापीठाच्या परिसरात सर्व वृक्षारोपण, मास्टर प्लॅन अंतर्गत पूर्वनियोजनानुसार व पध्दतशीर रित्या करावे जेणेकरुन विद्यापीठ परिसराची अग्निसुरक्षाचे काम सोईस्कर होईल.<br>३. उद्यान विभागामार्फत अधिविभाग व इतर इमारतींच्या भोवती अनियंत्रित वाढलेली वनस्पती साफ करुन खुली जागा राखण्यात यावी, परिसरात अग्निरेषा आखण्यात याव्यात. | उद्यान व अभियांत्रिकी विभाग |
| ४ | विषय क्र. ७ - नवीन विद्यार्थी व कंत्राटी कर्मचाऱ्याना ओळखपत्र देणे. | १. विद्यापीठ सेवेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना आस्थापना विभागामार्फत पास देण्यात यावेत. | आस्थापना विभाग |
| | | २. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया पूर्ण होताच ओळख पत्र देण्यात यावे | पी.जी.प्रवेश विभाग |
| | | ३. विद्यापीठातील परिसरात कंत्राटी कामांच्या निवदापत्रात सूचना समाविष्ठ करण्यात यावे की, विद्यापीठ परिसरात कंत्राटदाराच्या सेवेतील सर्व कामगारांना ज्या-त्या कंत्राटदाराचे ओळखपत्र आवश्यक असेल. सदर कामगारांना ओळख पत्र असल्यावरच विद्यापीठ परिसरात प्रवेश दयावा. | आस्थापना विभाग, अभियांत्रिकी विभाग व ज्या विभागाकडून कंत्राटी कर्मचारी घेण्यात येतात असे संबंधित विभाग. |

( डॉ. विलास द. नांदवडेकर)
**कुलसचिव**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रति,**

**संबंधित सर्व विभागप्रमुख, सर्व अधिविभाग व सर्व प्रशासकीय विभाग.**

**प्रत, (माहितीकरीता) -** १.मा. कुलगुरु कार्यालय २. मा.प्र-कुलगुरु कार्यालय ३. मा. कुलसिचव कार्यालय ४.मा. वित्त व लेखा अधिकारी कार्यालय ५. मा. प्र. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ. ६.जनसंपर्क अधिकारी ७.कायदा अधिकारी